MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# Vidyawarta™

Issue-14, Vol-10, April to June 2016



Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

18) भारतीय संघराज्य व्यवस्थेचे बदलते स्वरुप
प्रा.डॉ.लभाडे रत्नाकर बाबुराव, देगलूर. || 101

19) म. ज्योतीबा फुले यांचा समतावादी सामाजीक दृष्टीकोन :
डॉ. भुपेश चिकटे, चामोर्शी जि. गडचिरोली. || 104

20) वसमत तालुक्यातीलहळद उत्पादन
प्रो. खंदारे सिधु परसराम, जि. परभणी || 107

21) उत्पादकता वाढीतील कामगार शिक्षणाची भुमिका
डॉ.पी. एम. कडुकार || 109

22) केंद्र राज्य संबंध : दशा व दिशा
डॉ.लभाडे रत्नाकर बाबुराव, देगलूर. || 112

23) मराठीतील दलितस्त्रियांच्या आत्मकथनातील स्त्रीशक्तीचे दर्शन
डॉ. सुनिता उमरकर, तिसवाडी, गोवा || 118

24) आदिवासीचे आत्मभान जागविणारे कुसूम अलाम यांचे 'रान आसवांचे तळे'
प्रा.डॉ.श्याम मोहरकर, चंद्रपूर || 123

25) भारताच्या पहिल्या महीला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील...
प्राचार्य डॉ. ऐ. आर. म्हळसने, श्री. विष्णु बाळकृष्ण वहादुळे || 127

26) भटक्या विमुक्तांचे साहित्य : चिंता आणि चिंतन
प्रा. गोरे सरला वासुदेव, डॉ. व्ही.एन. पाटील || 133

27) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे संघटन
प्रा. एस. एस. उघडे, मंचर पुणे || 136

28) पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागाची पार्श्वभूमी
प्रा.सावंत एस.डी. गडहिंग्लज जि.कोल्हापूर || 140

29) संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील शाहिर -शाहिर अमर शेख व्यक्ती आणि कर्तुत्व
प्रशांत रामराव सातपुते, वर्धा || 143

30) नांदेड जिल्ह्यातील कृषि कर्जाच्या वसूली व थकबाकीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम
के.पी. देशमुख , डॉ. एस.एस. पतंगे जि. हिंगोली || 150

31) भारतातील भूमी सुधारणाची वाटचाल
प्रा. डॉ. जे.व्ही. गायकवाड, अमरावती || 153

32) बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेती जोडधंद्याचा समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. यादव घोडके ता. पाटोदा जि. बीड. || 158

33) विद्यार्थियों में मानसिक स्वास्थ्य तथा सांवेगिक बुद्धि का अध्ययन
Dr. Ved Prakash Rawat, Anamika Singh, Varanasi || 162

34) कांग्रेस के उदारवादी तथा उग्रवादी नेताओं और क्रान्तिकारियों की नीतियाँ ....
डा० (श्रीमती) रचना सिंह, देहरादून || 172

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

**18**

# भारतीय संघराज्य व्यवस्थेचे बदलते स्वरुप

**प्रा.डॉ.लखारे रत्नाकर बाबुराव**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**प्रस्तावना :**

संविधानानुसार भारत राज्यांचा संघ आहे. ज्यास अभ्यासकांनी एक वेगळी व अद्भूत संघीय व्यवस्था मानले. भारताची संघीय व्यवस्था भारतीय परिस्थितीनुसार बनवण्यात आलेले मिश्रित रुप आहे. या व्यवस्थेत केंद्र सरकार राज्य सरकारच्या तुलनेत अधिक शक्तिशाली आहेत. अर्थात भारतीय संघीय व्यवस्था केंद्राच्या बाजूने अधिक झुकलेली आहे. मागील दोन दशकात काही विशेष कारणांमुळे भारतीय संघीय व्यवस्थेच्या स्वरुपात अधिक बदल झाला. या नव्या व्यवस्थेस काही बुध्दीवाद्यांनी वास्तविक संघाचे नाव दिले. स्थानीय संस्थांना संघवादा अंतर्गत सत्ता व अधिकार देणे तसेच केंद्र व राज्य स्तरावर वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे सरकार बनल्यामुळे भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या स्वरुपात अभूतपूर्ण परिवर्तन झाले. राष्ट्रीय पक्ष कमकुवत झाले. प्रादेशिक पक्षाचा उदय केंद्र-राज्य संबंधासाठी एक चिंतन व अभ्यासाचा नवा विषय आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1) भारताच्या संघराज्य व्यवस्थेचे घटनात्मक व बदलते स्वरुप समजून घेणे.
2) भारतीय संघराज्यासमोरील आव्हानांवर प्रकाश टाकणे.
3) केंद्र-राज्य शासनाच्या बदलत्या स्वरुपास जाणून घेणे.
4) केंद्र-राज्य मतभेदांना दूर करण्यासाठी सुचवलेल्या उपायांना नमूद करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयाची मांडणी करताना ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीसह ग्रंथालयीन अभ्यास पध्दतींचा आधार घेवून मांडणी करण्यात आली.

**समस्यांची उकल :**

वर्तमान भारतीय राजकारणाकडे संविधान व संविधानकर्त्यांच्या नजरेने पाहिले असता अनेक प्रश्न निर्माण होतात. या सर्व प्रश्नांची उकल करुन त्यावर उपाय शोधणे भारतीयांचे कर्तव्य आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेने भारतीय शासन व राज्यव्यवस्थेच्या स्वरुप व संरचनेत आमूलाग्र बदल केले. या बदलाचा परिणाम भारतीय राजकारणावरही झाला. साहजिकच भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या स्वरुपात बदलत्या शासन व राजकारणाच्या प्रवाहाच्या काही सकारात्मक व नकारात्मक बदल झाला का ? या प्रश्नांची उकल करण्याच्या जाणिवेतून हा लेख प्रपंच करण्यात आला.

**तथ्य संकलन :**

या विषयाची मांडणी करण्यासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा आधार घेण्यात आला. त्यामुळे या अभ्यास पध्दतीची व संबंधित विषयाशी निगडीत दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेवून विषय मांडण्यात आला.

भारत एक संघात्मक राज्य आहे. ज्यात संघराज्य व्यवस्थेचे सर्व लक्षण समाविष्ट आहेत. भारतीय संघव्यवस्थेच्या स्वरुपाबाबत विभिन्न विचारवंताचे मत वेगवेगळे आहे. तसेच ही व्यवस्था एक वेगळी आहे. जी जगातील इतर देशांपेक्षा वेगळी आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युगोस्लाव्हिया इ. राष्ट्रे प्रादेशिक विकासासाठी केंद्राऐवजी राज्यशासनाच्या शक्तिला महत्वपूर्ण मानतात. तर काही देश राष्ट्रीय एकात्मता व सार्वभौमत्वासाठी मजबूत केंद्र सरकारची शिफारस करतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम 1 नुसार भारत राज्याचा संघ आहे. या व्यवस्थेत केंद्राच्या स्थितीस मजबूत बनवले. केंद्र-राज्य संबंधात प्रत्येक क्षेत्रात केंद्रास प्राथमिकता देण्यात आली. प्रसिध्द अभ्यासक डॉ.रजनी कोठारीच्या मते, राज्याच्या संस्थांचा जो ढाचा तयार झाला आहे, तो स्वरुपत: आधुनिक आहे. परंतू राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समानतेच्या दृष्टीने काही विशेष व्यवस्था करण्यात आली. ज्यामुळे ते पश्चिमेकडील राष्ट्रांपेक्षा वेगळे बनले. समवर्ती विषय आणि इतर विषयात केंद्रीय संसदेचे अधिकार राज्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. राज्यात घटनात्मक शासन व्यवस्था नष्ट झाल्यास संसद विधानमंडळ आणि त्याच्या शासनापासून अधिकार काढून घेवू शकते. केंद्रास विशिष्ट अधिकार देण्यात आले. अशाप्रकारे केंद्रास अधिक शक्तिशाली बनवले. तर दुसऱ्या बाजूने स्थानिक शासन संस्थांची स्थापना करुन राज्यशासनास अधिक कार्य देण्यात आले. शासन व्यवस्थेस संघीय स्वरुप देण्यात आले. शासनात जनतेस, प्रांतास, जिल्हा आणि गावाला सहभागी करुन घेण्यात आले.

भारतीय संविधानात संघ या शब्दाचा वापर करण्यात आला नाही. अमेरिका आणि कॅनडाच्या संघराज्याचे मिश्रीत रुप भारताने स्विकारले. संविधानाद्वारे केंद्र आणि राज्यात दुहेरी शासनप्रणालीची व्यवस्था करण्यात आली. केंद्र व राज्यात अधिकाराची निश्चिती करण्यात आली. भारतीय संघात्मक व्यवस्था विकेंद्रीकरणाच्या सिध्दांतावर आधारित आहे. संघराज्य व्यवस्थेला यशस्वी बनविण्यासाठी



Scanned by CamScanner

केंद्र आणि राज्य शासनात अनेक प्रकारच्या संबंधाची निर्मिती करण्यात आली. त्याची विभागणी तीन भागात केली जाते. 1) वैधानिक संबंध (2) प्रशासकीय संबंध (2) आर्थिक संबंध.

भारतीय घटनाकारांनी भारतीय परिस्थितीनुसार संघीय शासन व्यवस्थेचा अर्थ स्पष्ट केला. विविधतेत एकता ही भारताची विशेषता आहे. अनेक भाषा, जाति-धर्म व पंथास मानणारे लोक आहेत. या विविधतेला अनुरुप संघात्मक शासनाची निर्मिती करणे कठीण होते. ज्यामुळे देशाचे स्वातंत्र्य व सुरक्षा टिकुन राहील. भारतीय संघराज्याचे स्वरुप व तिच्या वैशिष्ट्यामुळे त्यास एक वेगळी ओळख प्राप्त झाली.

भारतीय संविधानाने वित्तीय साधनांची विभागणी केंद्र सरकारच्या बाजुने केली. राज्य शासन खर्चाबाबत उदार असते. खर्चासाठी लागणारे अतिरिक्त साधने जमा करण्यात अयशस्वी असते. राज्य शासन केंद्र शासनास आर्थिक मदतीची मागणी करत असतात. केंद्रावर कर्ज आणि अनुदानासाठी अवलंबुन राहतात. अशाप्रकारे केंद्र सरकार वित्तीय क्षेत्रात राज्यशासनाच्या तुलनेत अधिक शक्तिशाली आहे. प्रो.पायलीच्या मते, वर्तमान स्थितीत राज्याजवळ मर्यादित साधन आहेत. आपल्या अधिक विकास योजनांना कार्यान्वित करण्यासाठी केंद्राची मदत घ्यावी लागते. त्यामुळे त्यांना केंद्राचे नेतृत्व मान्य करावे लागते. बऱ्याचवेळा केंद्राच्या आदेशासमोर नतमस्तक व्हावे लागते.

1) कलम 248 नुसार काही विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट विषया बाबत कायदा निर्माण करण्याचे अधिकार केंद्रीय संसदेला प्राप्त झाले आहेत.

2) कलम 250 नुसार संकटकालीन स्थितित राज्याची सर्व कायदेशीर अधिकारावर भारतीय संसदेचा अधिकार असतो.

3) जर राज्यसभेत 2/3 बहुमतामुळे हा प्रस्ताव पास करत असेल कि, राज्यसूचीशी संबंधित कोणत्याही विषय राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचा आहे. तर संसदेस या विषयावर कायदा बनवण्याचा अधिकार प्राप्त होतो. (कलम 249)

4) जर दोन किंवा अधिक राज्य कायदेमंडळ एखाद्या विषयावर संसदेने कायदा बनवण्याची इच्छा व्यक्त करणारा प्रस्ताव पारित करत असतील, तर त्या राष्ट्रांसाठी त्या विषयावर कायदे बनवण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होतो. (कलम 252)

5) कलम 251 नुसार जर संसद आणि राज्य कायदेमंडळा मार्फत निर्मित कायदा परस्परविरोधी असेल तर केंद्राचा कायदा ग्राह्य धरला जातो.

संविधानात केंद्र अधिक शक्तिशाली आहे. तरी राज्याच्या स्वायत्तेचाही विचार करण्यात आला. केंद्र आणि राज्यात अधिकाराचे विभाजन के भारतीय संघात्मक शासन व्यवस्थेचे मुख्य कारण आहे. ज्याचा स्विकार आमच्या राज्यघटनेत करण्यात आला. राज्यांना केंद्राच्या अधिन ठेवण्यात आले हे विधान असत्य आहे. केंद्र सरकार आपल्या इच्छेने या अधिकार विभाजनाला बदलू शकत नाहीत. त्यात न्यायालयही बदल करु शकत नाही. त्यात घटना दुरुस्ती करता येते परंतू त्यास बदलता येत नाही. आणि बाणीच्या काळात राष्ट्रीय कार्यकारी मंडळास अधिक अधिकार देण्यात आले. संविधानातील कलम 352 नुसार युध्द आक्रमण किंवा अंतर्गत अशांतता व कायदा आणि सुव्यवस्था ढासाळली असल्यास भारत किंवा त्याच्या कोणत्याही भागात अशावेळी राष्ट्रपती आणिबाणीची घोषणा करतात. कलम 256 नुसार कोणत्याही राज्यात घटनात्मक प्रक्रियेनुसार शासन चालवण्यात अडचणी येत असतील तेव्हा राष्ट्रपती आणिबाणीची घोषा करतात. कलम 356 चा केंद्र सरकारद्वारा सर्वात अधिक दुरुपयोग करण्यात आला. ज्यामुळे राज्यशासनास निष्कासित करण्यात आले. त्यामुळे राजकीय अस्थिरता, स्पर्धा व निवडणुकीच्या अतिरिक्त खर्चाचा बोजा पडतो. भारतीय राजकारणात कलम 356 चा दुरुपयोग एक सर्वसाधारण घटना बनली आहे. ते कलम राजकीय वैमनस्याचे प्रतीक बनले. सहकारिया आयोगाची स्थापना व त्याच्या शिफारशी केंद्र-राज्य संबंधास सुदृढ व त्याच्या दुरुपयोगास रोखण्याचे एक महत्वाचे माध्यम आहे. परंतु शासनाने त्या शिफारशी पुर्णपणे स्विकारल्या नाहीत.

भारतीय संविधानात केंद्र आणि राज्याच्या अधिकाराचे सविस्तर व स्पष्ट वर्णन केले आहे. केंद्र व राज्यात अधिकाराचे स्वष्ट व सविस्तर वर्णन जगतील दुसऱ्या कोणत्याही संविधानात केले नाही. भारतात केंद्रीय संसदेला अनेक अधिकार प्राप्त केले. समवर्ती सूची व इतर सुचीत स्पष्ट केलेले विषय केंद्र व राज्यातील विवादास कमी करतात. विशेष अधिकार केंद्रास देण्यात आले. सर्वसाधारणपणे संघात्मक व्यवस्थेत केंद्र व राज्यास स्वतंत्र राज्यघटना असतात उदा : अमेरिका परंतू भारतात केंद्र व राज्याचे एकच संविधान आहे. आणिबाणीच्या काळात कलम 352 व 356 मुळे केंद्र सरकार अधिक शक्तिशाली बनते. घटनेनुसार केंद्र व राज्यस्तरावर वेगवेगळे सरकारची व्यवस्था आहे. ज्याद्वारे त्यांचे कार्यक्षेत्र पण निश्चित करण्यता आले, तसेच ते आपल्या कार्यक्षेत्रात कायदेपण बनु शकतात केंद्र व राज्य शासनास वेग-वेगळे कर लावण्याचा अधिकार आहे.

भारतीय संविधानाने दुहेरी न्याय व्यवस्थेऐवजी संघटित एकेरी न्यायप्रणालीचा अंगीकार केला. अमेरिका आणि ऑस्ट्रेलियन संघराज्यात केंद्र व राज्यांसाठी वेग-वेगळी न्याययंत्रणा आहे. भारतात सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय एक संघटित न्यायपालिके अंतर्गत येतात. तसेच त्यांच्यावर केंद्र व राज्याचे कायदे समप्रमाणात लागू



Scanned by CamScanner

होतात. केंद्र व राज्यात चांगले संबंध आणि योग्य शासन संचलनासाठी अखिल भारतीय सेवांची व्यवस्था करण्यात आली. या सेवेतील अधिकारी केंद्र व राज्य प्रशासनाच्या उच्च स्तरावर कार्य करतात. परंतु त्यांच्यावर केंद्र सरकारचे पूर्ण नियंत्रण असते. संघात्मक प्रणालीला, मजबूत करण्यासाठी केंद्र व राज्यात होणाऱ्या वादापासून वाचण्यासाठी संविधानात विशेष संस्थाच्या निर्मितीवर भर देण्यात आला. त्या अंतर्गत वित्त आयोग, निवडणुक आयोग, नियंत्रक व महालेखा परिक्षक व आंतरराज्य आयोगाची स्थापना करण्यात आली. वित्तीय प्रकरणात एकरुपता स्थापन करण्यासाठी नियंत्रक व महालेखा परिक्षकाच्या नियुक्तीची तरतूद आहे. केंद्र व राज्य स्तरावर कार्य करणाऱ्या नियंत्रक व लेखापरिक्षकाच्या निवडीची स्वतंत्र व्यवस्था आहे. अशाचप्रकारे संविधानात केंद्र व राज्य स्तरावर नि:पक्षपाती निवडणुका करण्यासाठी निवडणुक आयोगाची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक संघात्मक राज्यघटना केंद्र सकरार व राज्य सरकार परस्पर स्वतंत्र राहावे आणि त्यांच्याजवळ आपल्या जबाबदारीचे निर्वाहण करण्यासाठी वित्तीय साधन असावीत अशी व्यवस्था करते.

केंद्र व राज्य शासनात योग्य वित्तीय वितरण व्हावे यासाठी कलम 280 अंतर्गत वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगामार्फत राज्य व केंद्रात संतुलन व नियंत्रण ठेवण्याचे कार्य केले जाते. दुसऱ्या बाजुने गरजुवान राज्यांना आवश्यकती सर्व मदत करण्यासाठी केंद्रास मजबूर करते. केंद्रास वित्त आयोगाच्या शिफारशींची उपेक्षा करणे अशक्य असते.

**केंद्र-राज्य संबंधाचे बदलते स्वरुप**

केंद्र-राज्य सहकार्य आणि केंद्र-राज्य मतभेदातील 1967 हे वर्ष विभाजनकारी बिंदू ठरणारे आहे. 1967 च्या पूर्वीचा काळ केंद्र-राज्य सहकार्यांचा स्वर्णयुग आणि सत्ताधीश/शक्तीशाली केंद्र आणि आज्ञाधारक राज्यांचे युग होते. 1947 ते 1967 च्या दरम्यान केंद्र-राज्यात कोणताच वाद निर्माण झाला नाही. ज्याचे मुख्य कारण काँग्रेस पक्षाचे केंद्र आणि राज्यात सरकार होते. 1967 नंतर भारतीय राजकारणात अनेक महत्वपूर्ण बदल झाले. त्यामुळे केंद्र-राज्य संबंध मैत्रीपूर्ण व तणावपूर्ण बनले. याचे मुख्य कारण राज्यात विभित्र राजकीय पक्षांचे आघाडीसरकार स्थापन होणे, प्रादेशिक पक्षाची केंद्रीय शासनातील महत्वाची भुमिका आणि काही आर्थिक व सामाजिक कारणे.

भारताच्या मागील 25 वर्षांच्या राजकारणात असे अनेक प्रसंग निर्माण झाले. ज्यात सहकारी पक्षाने विशिष्ट अटींवरच केंद्रातील शासनाला आपले समर्थन दिले. 1995 नंतर केंद्रीय स्तरावर मुख्य राजकीयपक्ष असणाऱ्या काँग्रेस पक्षाची स्थिती कमजोर बनली. कोणत्याही राजकीय पक्षास स्पष्ट बहुमत न मिळणारी स्थिती उदयास आली. त्यामुळे अनेक पक्षांनी एकत्रित येवून आघाडी शासनाची स्थापना करुन देशाचा कारभार पुढे नेला. याला कंटाळलेल्या जनतेने 2014 च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय लोकशाहीची ताकत जगाला दाखवून देत नरेंद्र मोदी सरकारला बहुमताने संधी दिली. मोदी सरकारचा मागील दीड वर्षांचा कारभार पाहता हे सरकार बहुमतातले जरी असले तरी पंडीत नेहरु, इंदिरा गांधीच्या बहुमताच्या शासनाप्रमाणे शक्तीशाली नाही. भारताच्या राजकारणात, अस्थिरता आणि प्रादेशिक पक्षाच्या प्रमुखतेच्या युगाला तुर्तास तरी चाप बसली. त्यामुळे मोदी शासनाच्या काळात केंद्र-राज्य सरकारला नवीन आयाम मिळाले. मोदी शासनाचा कालखंड पूर्ण होण्यास बराच वेळ आहे. मोदीपूर्व काळात असे अनेक प्रसंग निर्माण झाले. ज्यात राज्य शासन केंद्र शासनाच्या तुलनेत अधिक शक्तीशाली जाणवली. पूर्वेकडील अनेक प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय शासनात सहकार्य पक्षाची भुमिका बजावली. जेंव्हा सहकारी राजकिय पक्षांनी आपल्या इच्छेनूसार केंद्रीय शासनाचे संचलन करुन त्यास विशिष्ट अटींच्या आधारे समर्थन देण्यास प्रारंभ केले. तेव्हा स्थिती आणखीन वाईट झाली. केंद्रात आपल्या इच्छेनूसार मंत्रालय व आपल्या राज्याला विशेष आर्थिक सहायता मिळवणे हे शासनात सहभागी होणाऱ्या राजकीय पक्षाची सर्वसामान्य मागण्या होत्या.

लालुप्रसाद यादव, ममता बॅनर्जी, चंद्राबाबु नायडू, जयललिता यांनी वेळावेळी केंद्र सरकारवर दबाव टाकून आपल्या मागण्यापूर्ण करुन घेतल्या. आपल्या इच्छेनूसार रेल्वे मंत्रालय बदलणे, विशिष्ट कायद्यास विरोध करणे (साम्यवाद्यांची आण्विक कराराबाबतची भूमिका), राष्ट्रीय दहशतवाद विरोधी कायद्यास विरोध, हे राज्य सरकारचे केंद्र सरकारवर दबाव टाकण्याचे उदाहरण आहे. मागील कांही काळापासून भारतीय संघव्यवस्थेत अनेकवेळा अशी परिस्थिती निर्माण झाली की, राज्यशासनाचे मुख्यमंत्री देशाच्या पंतप्रधानांसमोर एक समांतर शक्तीच्या रुपात उदयास आले. उदा : चंद्राबाबु नायडू, नरेंद्र मोदी इ. अशा स्थितीत केंद्र सरकारचे सहकारी राजकीय पक्षाचे मुख्यमंत्री अन्य राज्यांच्या मुख्यमंत्राच्या तुलनेत अधिक महत्वपूर्ण बनले. देशातील वाढता दहशतवाद, विघटनकारी आणि पृथकवादी प्रवृत्तिंना समाप्त करण्यासाठी भारत शासनाने दहशतवाद विरोधी केंद्र स्थापन करण्यासाठी शिफारस केली.

**केंद्र-राज्य मतभेदांना दूर करण्यासंबंधी कांही उपाय**

राष्ट्रीय आणि प्रादेशिक विकासासाठी केंद्र व राज्य शासनात योग्य समन्वय व चांगल्या संबंधाची आवश्यकता आहे. केंद्र शासनाद्वारे कलम 356 च्या दुरुपयोगास रोखण्याच्या दिशेने योग्य पाऊल टाकता येते. यासाठी सरकारिया आयोगाच्या शिफारशींचा विचार करावा लागेल. या आयोगाने कलम 356च्या दुरुपयोगा पासून वाचवण्यासाठी



Scanned by CamScanner

राज्यपालांच्या नियुक्तीवर राज्य शासनाच्या विचार घेण्याची शिफारस केली.

केंद्र-राज्य संबंधात सुधारणेसाठी प्रशासनिक सुधारणा आयोगाने आपल्या प्रतिनिवेदनात केंद्र-राज्य सहकार्यास अधिक सुकर करण्यासाठी आंतरराज्यीय परिषदेची आवश्यकता सांगितली. सहकारिया आयोगानेही केंद्र-राज्य संबंधात अनेक शिफारशी सोबत आंतरराज्य परिषदेच्या स्थापनेची शिफारस केली. संविधानातील कलम 263 नुसार या परिषदेचे मुख्य कार्य राज्यांत निर्माण होणाऱ्या वाद-विवादांचा तपास करणे त्याला सोडविण्यासाठी सल्ला देणे कलम 263 नुसार आंतरराज्यीय परिषदेची तरतूद करण्यात आली.

केंद्र-राज्य संबंधात सुधारणा करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आयोग, सरकारिया आयोगाने त्या दिशेने अनेक उपाय सुचवले. केंद्र-राज्य संबंधाच्या समस्यांवर शांततापूर्ण व गांभीर्याने विचार-विनिमय करण्याची आवश्यकता आहे. केंद्र-राज्य संबंधात संतुलन निर्माण करण्यासाठी राज्यांना आर्थिक व प्रशासकीय ताकत अधिक देण्याची गरज आहे. राज्याच्या आर्थिक साधनांत वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन ते केंद्रावर अवलंबून राहणार नाहीत. त्या दिशेने वित्तीय आयोगाची भुमिका महत्वाची असू शकतो.

**संदर्भ ग्रंथ :**

1) Introduction to the constitution of India- D.D.Basu 22nd Edition-Lexis-Nexis-Haryana.

2) भारतीय शासन व राजकारण-डॉ.भा.ल.भोळे, पिंपळापूरे अँड ब्रदर्स, नागपूर.

3) भारतीय संविधान राजकारण आणि कायदा-स्मिता जोशी-पियर्सन, दिल्ली.

4) हमारी संसद-सुभाष कश्यप-नैशनल बुक ट्रस्ट, इंडिया.

❑❑❑



Scanned by CamScanner